Literacy for a Billion

Movie: Not Only Mrs. Raut
Year: 2003

Song: Ranbhari Jiv Nhala
Lyricist:

रानभरी जीव न्हाला
गंजलेल्या पावलांना
वाटा
सुचेना
गर्दीत हरवला गाव
मेलेल्या नजरेला ठाव दिसेना

रानभरी जीव न्हाला
गंजलेल्या पावलांना
वाटा
सुचेना
गर्दीत हरवला गाव
मेलेल्या नजरेला ठाव दिसेना

ही माणसांची गर्दी
का भास हालती फक्त
जगण्याच्या घाईसाठी
विझलेले थंड रक्त

प्रेतांचे जंगल धावे
नशीब वाऱ्या हाती
धावती उरी कवटाळून
विस्कटलेली नाती
उन जन्माचे माथ्याला
भळभळत्या क्षितीजाला सांग कळेना

उठते वादळ आणि
पाचोळा उडून जातो
उधाण परतून जाते
फक्त किनारा उरतो
जळताना स्वप्ने माझी
विझलेले डोळे माझे
जगण्याचे मानेवरती
कशास ठेवू ओझे
अस्तित्व संपले तरीही
गर्भात खोल रूतलेला घाव मिटेना

*Disclaimer: PlanetRead does not own these lyrics and is not using them for any commercial purpose. For over 20 years, PlanetRead has been subtitling Bollywood songs for mass literacy. These lyrics are being offered as part of PlanetRead's literacy development initiative.*